**प्रेस नोट दिनांक ०८/०६/२०१९**
**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**
**वाईट मित्रांच्या संगतीत असलेल्या १९ वर्षीय मुलाचे समुपदेशन करून त्यास चांगल्या पगाराची खाजगी नोकरी लावली.**

दि. ०६.०६.२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे येथे रात्रपाळी कर्तव्यावर ठाणे अंमलदार सपोफौ तुपे, पो.ना. ढगे, पो.शि.महावीर दावणे, पो.शि. चव्हाण व म.पो.शि. बहिरट असे हजर असताना, महिला नामे सत्यभामा अरूण गायकवाड वय ४८ वर्षे, रा. घर नं. १३०, घोरपडे पेठ पुणे यांनी रडत येवून कळविले की, त्या लोकांच्या घरी धुणे-भाडयांची कामे करून त्यांचा एकलुता एक मुलगा अरविंद अरूण गायकवाड वय १९ वर्षे रा. सदर यांस ११ वीमध्ये शिकवत आहेत. त्यांचे पती त्यांचा मुलगा अरविंद हा ०१ वर्षाचा असताना मयत झाल्याचे सांगितले. सदर मुलांस खुप कष्टाने लहानचा मोठा केला असून सद्या तो शिक्षण घेत एका कुरीयर कंपनीमध्ये ५०००/- रूपंयावर पार्टटाइम जॉब करीत आहे. परंतु गेल्या ०२ महिन्यापासून त्याचे वाईट मित्रांच्या संगतीने तो वाईट सवयींच्या आहारी जात असून त्यांना मदतची आवश्यकता असल्याचे सांगितले.

नमुद कर्मचारी पो.शि.महावीर दावणे, पो.शि. चव्हाण व म.पो.शि. बहिरट यांनी तक्रारदार यांचा मुलगा अरविंद गायकवाड यांस व त्याचे मित्रांना खडक पोलीस ठाणे येथे बोलावुन घेवून त्याचेकडे चौकशी केली असता, त्याने सांगितले की, तो कुरीयर कंपनीमध्ये ५०००/- रूपयांवर काम करीत असून त्याचेकडून पगारापेक्षा जास्त काम करून घेतले जात असल्याचे सांगितले. कर्मचारी पो.शि. महावीर दावणे यांनी सदर मुलांस दुसऱ्या ठिकाणी पहिल्यापेक्षा जास्त पगाराच्या नोकरीची व्यवस्था केली असल्याचे सांगितले. तसेच सदरवेळी नमुद कर्मचारी यांनी सदर मुलाचे व त्याचे मित्रांचे समुपदेशन करून वाईट सवयींच्या आहारी न जाण्याचा सल्ला देवून यांचे घरी सुखरूपपणे पाठविण्यात आलेले आहे.

**( भरत जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.

